**<u>विशेष दावा क्र. २३१/२०२२ मधील नि. ३० वरील आदेश</u>.**

(**CNR–MHAH** २३–००१३२४–२०२२)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्रं.५ यांनी अर्जात कथन केले आहे की, त्यांना वेळेत कैफीयत दाखल करणे आवश्यक होते, परंतु प्रतिवादी क्र. ५ हे पुणे येथे नोकरीस असल्याने व नोकरीतुन रजा न मिळाल्यामुळे त्यांना मुदतीत कैफीयत सादर करणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांनी जाणिवपुर्वक विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र. ५ ची कैफीयत अभिलेखावर न आल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांना कैफीयत देण्यास परवानगी मिळावी असे त्यांचे कथन आहे.

३. वादींनी त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. वादीचे कथनानुसार, प्रतिवादीने दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी व वादीला त्रास देण्याचे उद्देशाने कैफीयत देण्यास विलंब केला आहे. उशिराचे कारण योग्य नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे वादीचे कथन आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. ५ यांना दिनांक १२/१२/२०२२ रोजी समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दिनांक १९/१२/२०२२ रोजी प्रकरणात हजर झाले. त्यांनी समन्स बजावणी पासुन कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी विहित मुदतीत कैफीयत न दिल्याने त्यांचे विरुध्द नि. १ वर दिनांक ०९/०३/२०२३ रोजी विनाकैफीयत आदेश झाला आहे व प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०६/०४/२०२३ रोजी म्हणजेच २७ दिवसांच्या विलंबाने दाखल केलेला आहे असे दिसुन येते. प्रस्तुत दावा अद्याप चौकशीसाठी नेमण्यात आलेला नसुन प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असल्यामुळे प्रतिवादी यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास

मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे कैफियत देण्यास झालेल्या विलंबाबाबत खर्च देण्याचे अटीवर अर्ज मंजूर करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.३०) येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्रं. ५ ची कैफियत वाचुन नोंदविण्यात येत आहे.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2023.07.05 13:29:26 +0530

श्रीगोंदा.
दिनांक ०५/०७/२०२३.

**( ए.एन. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.